SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/जिसांका/२०२३-२४/ 43 दिनांक : 08/05/2024

# स्मरण परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.

**विषय : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन २०२३-२४**
अंतर्गत विहीत नमुन्यातील माहिती उपलब्ध करुन देणेबाबत....

**संदर्भ :**
१. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/जिसांका/२०२३-२४/४२, दि.३०/०४/२०२४ रोजीचे सांख्यिकी कक्षाचे परिपत्रक व ई-मेल.
२. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/जिसांका/२०२३-२४/४१, दि.२०/०४/२०२४ रोजीचे सांख्यिकी कक्षाचे परिपत्रक व ई-मेल.
३. क्र.जिसांका/को/जिसाआस/२०२४/१४४, दि.०१/०४/२०२४ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर यांचे पत्र.
४. क्र.जिसांकासां/जिसाआस/२०२४/१२३, दि.०५/०४/२०२४ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सांगली यांचे पत्र.
५. क्र.जिसांकासां/सांस-/जिसाआस/२०२४/१७०(अ), दि.०८/०४/२०२४ रोजीचे जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सातारा यांचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दरवर्षी वरील कार्यालयाकडून जिल्हा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षकांच्या संख्येची प्रवर्गनिहाय माहिती विहित नमुन्यात देण्याबाबत कळविण्यात येते. सदरची माहिती अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या संकेतस्थळावर आपल्या महाविद्यालयानी भरलेल्या माहिती वरुन तयार करुन पाठविण्यात येते.

सदरची माहिती **दि.२६/०४/२०२४ तसेच दि. ०४/०५/२०२४** पर्यंत खालील नमूद केलेल्या गुगल फॉर्ममध्ये नोंदविण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये कळविण्यात आलेले होते. सदर माहितीचा आढावा घेतला असता अद्याप आपल्या महाविद्यालयाची माहिती गुगल फॉर्ममध्ये नोंद केलेली दिसुन येत नाही. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सदर बाब आपल्या महाविद्यालयातील संबंधीत प्रशासकीय सेवक / कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करुन घ्यावी.

सदर कार्यालयास **वरील माहिती तात्काळ सादर करावयाची असल्याने सदर माहिती गुगल फॉर्ममध्ये दि.१०/०५/२०२४ पर्यंत नोंदवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती. सदरची मूदतवाढ ही अंतिम राहील. नमूद केलेल्या मूदतीपूर्वी आपल्या महाविद्यालयाने माहिती गुगल फॉर्ममध्ये न भरल्यास आपल्या महाविद्यालयाची शिक्षक व विद्यार्थी संख्या निरंक समजून उपरोक्त कार्यालयास पाठविण्यात येईल. सदर निरंक माहितीबाबत काही प्रश्न अथवा अडचणी उद्भवल्यास आपले महाविद्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

GOOGLE FORM LINK :- https://forms.gle/mmdw25arZnKJMZTGA

**गुगल फॉर्ममध्ये माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयाने सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव